सकाळ

संवाद



प्रशांत भोसले

# समाजकार्य आणि त्याची क्षेत्रे

सामाजिक समस्या आपल्या समाजातील प्रत्येक क्षेत्रामध्ये दिसून येतात. त्यामुळे समाजकार्याच्या माध्यमातून आपण सर्वच क्षेत्रांमध्ये व्यावसायिक दृष्टिकोनातून काम करू शकतो. कुटुंब आणि बालकल्याण या क्षेत्रात समाजकार्याचे शिक्षण घेऊन कौटुंबिक कलह आणि लहान मुलांचे होणारे शोषण यांसारख्या सामाजिक समस्यांवर काम करू शकतो. हे काम करताना समुपदेशक, परीविक्षा अधिकारी, समाज कार्यकर्ता अधीक्षक आणि गृहपाल यांसारख्या वेगवेगळ्या पदांवर कार्य करू शकतो. दुसरे क्षेत्र म्हणजे समुदाय विकास. या समाजकार्याच्या क्षेत्रामध्ये ग्रामीण शहरी आणि आदिवासी भागातील विविध सामाजिक समस्या याबाबतीत अभ्यास करून त्या संदर्भातील प्रश्न सोडविण्यासंदर्भात डावपेच आणि तंत्रे याबाबत कौशल्य विकसित करता येतात. अभ्यास केलेले समाज कार्यकर्ते समुदाय संघटक, प्रकल्प समन्वयक, संशोधन अधिकारी, विस्तार अधिकारी, समाज कल्याण अधिकारी यांसारख्या पदांवर कार्यरत असतात. तिसरे महत्त्वाचे असे वैद्यकीय आणि मानसोपचार क्षेत्र आहे.

कोरोनानंतर वैद्यकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदल झालेले दिसतात. ते वैद्यकीय व्यवस्थेतील त्रुटी समोर आल्यानंतरचे प्रामुख्याने असल्याचे जाणवते. समाजकार्याचे या क्षेत्रात शिक्षण घेतलेले सर्व विद्यार्थी, हे यासाठी आवश्यक असलेले तंत्रसाधन आणि कौशल्य व्यावसायिकरित्या अभ्यासून तयार झालेले असतात.

## कल्याण आणि कार्मिक व्यवस्थापन

औद्योगिक क्षेत्राचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. तेथे नियमित, कंत्राटी, अर्धवेळ, पूर्णवेळ अशा प्रकारे कामगार काम करत असतात. त्या उद्योगधंद्याच्या स्वरूपानुसार आणि त्यातील व्यवस्थापनानुरूप कामगारांना वेगवेगळ्या प्रश्नांना सामोरे जावे लागते. अशावेळी अशा क्षेत्रांमध्ये मानव संसाधन अधिकारी, कामगार कल्याण अधिकारी, प्रकल्प समन्वयक, प्रकल्प अधिकारी, प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार अशा पदांवर प्रशिक्षित व्यावसायिक समाज कार्यकर्ता कार्य करत असतो. याव्यतिरिक्त गुन्हेगारी आणि सुधारक सेवा क्षेत्र यामध्ये समाज कार्यकर्ता हा समुपदेशक, मध्यस्थ, संशोधक, संघटक या भूमिकांमध्ये शासकीय, गैरशासकीय ठिकाणी काम करताना दिसतो. मानवी जीवनातील व्यामीश्रता समाजकार्याच्या प्रशिक्षित कार्यकर्त्यास नवनवीन क्षेत्रे खुली करत आहे. विज्ञान आणि समाज, लिंगभाव आणि समाज, सामाजिक उद्योजकता, सामाजिक कौशल विकास, सार्वजनिक आरोग्य, जीवनमान आणि निरंतर विकास, दलित आणि आदिवासी केंद्रित समाजकार्य इत्यादी.

## समाजकार्य आणि उपलब्ध शिक्षण

समाजकार्य अभ्यासक्रमाच्या अंतर्गत भारतामध्ये प्रमाणपत्र पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएच. डी आणि पोस्ट डॉक्टरेट असे कोर्सेस उपलब्ध आहेत. हे शिक्षण आपल्याला पूर्ण वेळ, अर्धवेळ, तसेच दूरस्थ पद्धतीने पूर्ण करता येते. पुढील भागात याचे अभ्यासक्रम कोठे उपलब्ध आहेत, याची माहिती घेऊयात.

**(लेखक समाजकार्य विषयाचे आणि आदिवासी विषयाचे संशोधक, अभ्यासक आहेत.)**

Kolhapur, Main
08/03/2023 Page No. 10